महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

# सोयाबीन पिकाचे वेळापत्रक

श्री. एस. एम. तोटावार
प्रकल्प संचालक, आत्मा तथा
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, वाशिम
( नविन प्रशासकिय ईमारत, दुसरा मजला रुम नं. 209, 210,211,212 )
फोन नं 07252 – 235813, ईमेल- dsaowashim@gmail.com

# पेरणीपुर्वी करावयाची कामे

- मातीचा नमुना दर दोन वर्षानी काढुन माती परीक्षण करुन घ्यावे.
- जमीनीची नांगरटी तिन वर्षातुन एकदा करावी.
- एकरी दहा बैलगाडया चांगले कुजलेले सेंद्रीय खत जमीनीत मिसळावे.
- वखरणी करुन जमीनीत सेंद्रीय खत मिसळुन घ्यावे.
- वळवाचा पाऊस झाल्यानंतर वापसा येताच जाभुंळवाही करावे.
- दहा वर्षाच्या आतील प्रसारीत वाणाचे बियाणे वापरावे.
- घरगुती बियाणे वापरावयाचे असल्यास स्पायरल सेपरेटर मधुन प्रतवारी करुन घ्यावी.
- प्रतवारी केलेल्या बियाण्याची घरगुती पध्दतीने उगवणक्षमता तपासुन घ्यावी.
- ७० टक्के पेक्षा जास्त उगवणक्षमता असलेले बियाणे पेरणी करिता राखुन ठेवावे.
- कडुलिंबाच्या निंबोळया गोळा करुन ठेवाव्यात.
- माती परिक्षण अहवाल व शिफारशी नुसार लागणा-या रासायनिक खताची खरेदी करुन ठेवावी.
- जिवाणु संवर्धने व ट्रायकोडर्माची उपलब्धता करावी.
- आंतरपिकाची निवड करावी. उदा – तुर (६:१, ४:२, ४:१ )
- सापळा पिकाची निवड करुन बियाणे उपलब्ध करुन घ्यावे. उदा- एरंडी व सुर्यफुल पिकाभोवती एक ओळ लावल्यामुळे स्पोडोप्टेरा अळीपासुन संरक्षण होते.
- चवळी, झेंडु या सापळा पिकामुळे मावा व पांढ-या माशी व गोगलगायचे नियंत्रण करण्यास मदत होते.
- दशपर्णी अर्क तयार करण्याकरीता दहा वनस्पतीचे पाने आंबविण्याकरीता टाक्यामध्ये साठवावी.







# पेरणीचा दिवस

- पेरणीकरीता निवडलेल्या बियाण्याची रासायनिक, जैविक व जिवाणु संवर्धनाची बिजप्रक्रिया पेरणीपुर्वी करुन बियाणे सावलीत सुकवुन ठेवावे. (FIR)
- रासायनिक बिजप्रक्रिया (थायोमीथोक्झाम २५%) केल्यामुळे खोडमाशी पासुन पिकाचे संरक्षण होते.
- ७५ ते १०० मी.मी. पाऊस पडुन वापसा आल्यानंतर किंवा जमीनीत ६ इंच खोल ओल असतांना पेरणी करावी.
- पेरणी यंत्राद्वारे पेरणी करावयाची असल्यास पेरणी यंत्राची तपासणी करुन योग्य प्रमाणात बियाणे व रासायनिक खत पडण्याकरीता यंत्राचे कॅलीबरेशन करुन घ्यावे.
- पेरणीच्या वेळी शिफारशीनुसार बियाणे, माती परीक्षण अहवाल व शिफारशीनुसार रासायनिक खताचा तसेच गंधकाचा वापर करावा.
- पेरणीची खोली ३ ते ५ से.मी. पेक्षा जास्त असु नये.
- पेरणी करतांना बियाणे ३ ते ५ से.मी. खोलीवर त्या खाली ५ से.मी. खोलीवर  रासायनिक खताची पेरणी करावी.
- पेरणीचा कालावधी ७ जुन ते १५ जुलै आहे.
- पेरणी करीत असतांना बियाणे झाकण्याकरीता योग्य रासणी होत असल्याची खात्री करावी.
- पिकाभोवती सापळा पिकाची पेरणी करावी. उदा – एरंडी, चवळी, सुर्यफुल, मका, झेंडु इ.





# पेरणीपासुन २० दिवसापर्यंत करावयाची कामे

- पेरणी पुर्ण झाल्याबरोबर ४८ तासाच्या आत आवश्यकता असल्यास शिफारशीनुसार उगवणपुर्व तणनाशकाची फवारणी जमीनीत चांगली ओल असतांना करावी. उदा – पेंडामेथालीन (स्टॉम्प).
- उगवणीनंतर तणनाशकाची फवारणी करावयाची असल्यास पेरणीपासुन २० दिवसाच्या आत शिफारस केलेले तणनाशक उदा – इमॅझीथायपर ची फवारणी करावी.
- तणनाशक फवारणी करण्याकरीता वापरण्यात येणा-या पाण्याचा आम्लविम्ल निर्देशांक ३ ते ६ च्या दरम्यान असावा.
- फवारणीकरीता शुध्द पाण्याचा वापर करावा, गढूळ पाणी वापरु नये.
- उगवणी पासुन १५ दिवसाच्या आत निंबोळी अर्काची फवारणी करावी.
- पिकावर सुरुवातीच्या काळात कटवर्म (पैसा) या किडीचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर होतो याकरीता बंदोबस्त करावा.
- सोयाबीन पिकावर सुरवातीलाच खोडमाशी (स्टेमफ्लाय) चा प्रादुर्भाव १० ते १५ दिवसात येतो याचे निरीक्षण करुन खोडमाशीचा प्रादुर्भाव आर्थिक पातळीच्या (१० ते १५ टक्के किंवा ३ ते ५ प्रादुर्भाव ग्रस्त रोप/ मिटर) वर असल्यास कोणतेही एक किटकनाशकाची फवारणी करावी.
- उगवणीनंतर १५ दिवसाच्या आत हेक्टरी १५ ते २० कामगंध सापळे लावावे. सुरुवातीस उंटअळीचा प्रादुर्भाव येतो त्याकरीता उंटअळीचे (हेलीकोवर्पा) लुर्स वापरावे.
- कामगंध सापळयामध्ये सतत आठ दिवस १२ ते १५ पतंग आढळुन आल्यास किटकनाशकाची फवारणी करणे आवश्यक आहे.
- हेक्टरी १५ ते २० निळे, पिवळे चिकट सापळे वापरावे.







# पेरणीपासुन २१ ते ४० दिवसापर्यंत करावयाची कामे

- आंतरमशागत डवरणी व निंदणी करुन शेत तणविरहीत ठेवावे.
- जास्त पावसामुळे शेतात पाणी साचले असल्यास शेताबाहेर पाणी काढुन दयावे.
- आवश्यकता असल्यास किड नियंत्रणाकरीता किटकनाशकाची फवारणी करावी.
- पिक फुलावर येण्यापुर्वी १९:१९:१९ या विद्राव्य खताची फवारणी करावी. (१०० ग्रॅम / १० लिटर पाणी)
- हेलीलुर्स २० दिवसानंतर बदलुन घ्यावेत.
- दशपर्णी अर्क फवारणी करावी.
- आवश्यकता असल्यास संरक्षित ओलित करावेत.
- पुढील वर्षासाठी बियाणे राखुन ठेवण्याकरीता प्लॉटची निवड करावी.
- निवडलेल्या प्लॉटमधील भेसळयुक्त झाडे काढुन टाकावे.







# पेरणीपासुन ४१ ते ५० दिवसापर्यंत करावयाची कामे

- हेक्टरी १५ ते २० पक्षी थांबे उभारावे.
- तंबाखुवरील पाने खाणा-या अळीचे निरीक्षणे / नियंत्रण करण्याकरीता स्पोडोप्टेरा लुर्स फेरोमन ट्रपमध्ये लावावे.
- आवश्यकतेनुसार व किडीचे आर्थिक नुकसान पातळी पाहुन किटकनाशकाची फवारणी करावी.
- विद्राव्य खताचा फवारणी करिता वापर करावा. (००:५२:३४) (१०० ग्रॅम / १० लिटर पाणी)
- उपलब्धतेनुसार व आवश्यक असल्यास संरक्षित ओलीत करावे.
- निळे, पिवळे चिकट सापळे बदलावे.



## पेरणीपासुन ५१ ते ८० दिवसापर्यंत करावयाची कामे

- ❑ स्पोडोप्टेराचे २० दिवसानंतर लुर्स बदलावे.
- ❑ आवश्यकतेनुसार जैविक व रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावी.
- ❑ दाणे भरण्याच्या अवस्थेत विद्राव्य खताची फवारणी करावी. (००:००:५०) (१०० ग्रॅम / १० लिटर पाणी)

## पेरणीपासुन ८१ ते १२५ दिवसापर्यंत करावयाची कामे

- ❑ पिक परिपक्व होण्याच्या अवस्थेत असतांना बुरशीनाशकाची फवारणी करावी. (टेबुकोनॅझॉल १५ मी.ली. किंवा २० ग्रॅम / १० लि. पाणी)
- ❑ पिक परिपक्व झाल्यानंतर यंत्राच्या किंवा मजुराच्या सहाय्याने काढणी व मळणी करावी.
- ❑ मळणी केलेले धान्य सावलीत सुकवुन स्पायरल सेपरेटर मधुन प्रतवारी करुन घ्यावी.
- ❑ अंदाजे १० ते १२ टक्के आद्रतेचे प्रमाण असतांना कोरडया व हवेशीर ठिकाणी साठवणुक करावी.
- ❑ गरजेनुसार व बाजारातील दरानुसार विक्री व्यवस्था करावी.



# धन्यवाद !

